**<u>ठळक बातम्या</u>**

- निर्यातदारांसाठीच्या पत हमी योजनेमुळे स्पर्धात्मकता वाढेल, व्यवसाय सुलभ होईल आणि भारत एक स्वावलंबी राष्ट्र बनायला मदत होईल, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी देशव्यापी अभियानात आतापर्यंत ३ लाखांहून अधिक ठिकाणी छापेमारी

- दिल्ली स्फोटातल्या हल्लेखोराची ओळख पटली

- अमेरिकेतला आतापर्यंतचा सर्वात मोठा शटडाऊन संपुष्टात

**आणि**

- आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताला आज दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजूर केलेल्या निर्यातदारांसाठीच्या पत हमी योजनेमुळे स्पर्धात्मकता वाढेल, व्यवसाय सुलभ होईल आणि भारत एक स्वावलंबी राष्ट्र बनायला मदत होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरल्या पोस्टमधे म्हटलं आहे. यात त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांचं कौतुक केलं. निर्यात प्रोत्साहन अभियानामुळे स्पर्धात्मकता वाढेल, लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना, प्रथमच निर्यात करणाऱ्यांना तसंच कामगार केंद्रित क्षेत्रांना मदत होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. खनिजांसाठी रॉयल्टी दरांचं सुसूत्रीकरण केल्यामुळे शाश्वतता आणि स्वावंलबन वाढीस लागेल, यामुळे पुरवठा साखळी मजबूत होईल, आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक काल नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यात निर्यातदारांसाठी नवीन पत हमी योजनेला मंजूर देण्यात आली. या योजने अंतर्गत २० हजार कोटी रुपयांपर्यंतचं अतिरिक्त कर्ज दिलं जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. याशिवाय सिझियम, ग्रेफाइट, रुबिडियम आणि झिरकोनियम या खनिजांसाठी रॉयल्टी दरांचं

सुसूत्रीकरण करणं तसंच, २५ हजार ६० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या निर्यात प्रोत्साहन अभियानाला मंजुरी देण्यात आली. याबद्दल अश्विनी वैष्णव म्हणाले.

**- - होल्ड बाईट वैष्णव - -**

दिल्लीमधल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना मंत्रिमंडळ बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली. सरकार कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही, असं वैष्णव यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी शेती आणि शेतकरी कल्याण विभागानं देशभरात चालवलेल्या अभियानात आतापर्यंत ३ लाखांहून अधिक ठिकाणी छापेमारी केली असून सुमारे साडेतीन हजारांहून जास्त दुकानांचे परवाने रद्द केले आहेत. या कारवाईत ४१८ जणांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तसंच राज्यातल्या सुमारे एक हजार दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले.

रब्बीच्या हंगामात शेतकऱ्यांना योग्यवेळी खतं उपलब्ध व्हावीत तसंच खतांची साठेबाजी रोखण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आलं आहे. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, हरियाणा, पंजाब, ओदिशा या राज्यात छापेमारी करण्यात आली. या कारवाईमुळे खतांचा कृत्रिम तुटवडा आणि किमतीत केलेले फेरफार रोखता येतील.

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवणारी व्यक्ती डॉक्टर उमर उन नबी असल्याचं डीएनए चाचणीतून स्पष्ट झालं आहे. स्फोटानंतर त्याचा पाय स्टीअरिंग व्हील आणि ॲक्सिलरेटरमध्ये अडकला होता. त्याचा डीएनए नमुना त्याच्या आईशी जुळला असल्याची माहिती, दिल्ली पोलिसांनी दिली.

दरम्यान, दिल्ली मेट्रोचं लाल किल्ला स्थानक सुरक्षेच्या कारणास्तव पुढची सूचना मिळेपर्यंत बंद राहील असं मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कळवलं आहे. या तपासादरम्यान, अलफलाह विद्यापीठाच्या आवारातून आज आणखी एक कार पोलिसांनी ताब्यात घेतली. हे वाहन, संशयित शाहीन शाहीदच्या नावावर असल्याचं समजतं. काल दिल्लीत सर्व पोलीस ठाणी, तपासणी नाके तसंच हरयाणा, उत्तर प्रदेश पोलिसांसाठी दक्षतेचा इशारा जारी केला

आहे. जम्मू काश्मीरमधे जैश ए मुहम्मद या प्रतिबंधित संघटनेशी संबंधित १३ ठिकाणांवर आज छापे टाकण्यात आले.

<><><><>

प्रतिबंधित दहशतवादी संघटना अल कायदाने रचलेल्या गुजरात दहशतवादी कट प्रकरणी, राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल पाच राज्यात १० ठिकाणी छापे टाकले. छाप्यांदरम्यान अनेक डिजीटल उपकरणं आणि गुन्हेगारीशी निगडीत कागदपत्रं जप्त करण्यात आली असून, न्यायवैद्यक विश्लेषणासाठी पाठवण्यात आल्याचं एनआयएने म्हटलं आहे.

<><><><>

बिहारमधील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजल्यापासून होणार आहे. ३८ जिल्ह्यांमधे मिळून ४६ मतमोजणी केंद्र आहेत. नमुना १७ क आणि ईव्हीएम डाटा जुळत नसल्यास आणि सरावासाठीचा डेटा जिथं नष्ट करायचा राहीला असेल, तिथं व्हीव्हीपॅट मोजणी अनिवार्य करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

<><><><>

अमेरिकन संसदेत तात्पुरत्या निधीपुरवठ्याचं विधेयक मंजूर झालं आहे. या विधेयकावर अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची सही झाल्याने अमेरिकेतला आतापर्यंतचा सर्वात मोठा शटडाऊन संपुष्टात आला आहे. ओबामाकेअर या आरोग्यविमा योजनेचं अनुदान वाढवण्याबद्दल डेमोक्रेटीक पक्ष आग्रही होता. त्यामुळे शटडाऊन सुरु होतं. याविषयीचा तिढा सुटत नसल्याने अर्थसंकल्प मंजूर होईपर्यंत तात्पुरता निधी पुरवठा करण्याचं बिल अमेरिकन संसेदत मांडलं गेलं. डेमॉक्रेटीक पक्षाच्या आठ सदस्यांनी रिपब्लिकनच्या बाजूने मत दिल्याने हे विधेयक मंजूर झालं. आता अमेरिकेत गेले ४२ दिवस सुरु असलेला शटडाऊन संपून सरकारी कामकाज सुरळीत सुरु होईल.

<><><><>

उत्तरगाझामध्ये मानवतावादी मदत ट्रकना परवानगी देण्यासाठी झिकिम फाटक पुन्हा उघडलं असल्याचं इस्रायलनं म्हटलं आहे. इस्रायलकडून कडक तपासणी आणि निर्बंधांमुळं गाझाला मदत पोहोचवण्यात अडथळा येत असल्याचं मानवतावादी मदत देणाऱ्या अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे. मदतीचे ट्रक गाझामध्ये शिरल्यानंतरही,पायाभूत सुविधा

नसल्यानं आणि लुटमारीच्या धोक्यामुळं लोकांपर्यंतवस्तुंचा पुरवठा वितरित करणं कठीण झालं आहे.

<><><><><>

प्रोजेक्ट चित्ता अंतर्गत भारतातील चित्त्यांची संख्या वाढविण्यासाठी बोत्सवाना आज आठ चित्ते भारताला हस्तांतरित करणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाचे राष्ट्रपती डुमा बोको यांच्यातल्या द्विपक्षीय चर्चेनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत काल ही घोषणा करण्यात आली. दोन्ही देशांमधे वन्यजीव संवर्धनात द्विपक्षीय सहकार्याचा एक नवीन अध्याय यातून सुरु होत आहे.

दरम्यान, दोन्ही राष्ट्रपतींच्या द्विपक्षीय चर्चेनंतर, आरोग्यसेवा आणि औषधनिर्माण क्षेत्रात सामंजस्य करार करण्यात आले. भारत बोत्सवानाला एचआयव्ही उपचारांसाठी एआरव्ही औषधं पुरवणार आहे. राष्ट्रपती मुर्मू यांचं  बोत्सवानाच्या संसदेत भाषण झालं. तिथल्या भारतीय समुदायाशी त्या  आज संवाद साधणार आहेत, त्यानंतर त्या मायदेशी परत येतील.

<><><><><>

ढाका इथं झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताने आज दोन सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. महिलांच्या कंपाऊंड सांघिक प्रकारात ज्योती सुरेखा वेण्णम, प्रितिका प्रदीप आणि दीपशिखा यांच्या संघानं कोरियाचा २३६ - २३४ असा पराभव करत सुवर्ण पदक पटकावलं. तर मिश्र सांघिक प्रकारात अभिषेक वर्मा आणि दीपशिखा यांनी बांग्लादेशचा १५३ - १५१ असा पराभव करत विजेतेपद पटकावलं. पुरुषांच्या कंपाऊंड सांघिक प्रकारात अभिषेक वर्मा, साहिल जाधव आणि प्रथमेश फुगे यांच्या संघाचा अंतिम फेरीत कझाकिस्तानच्या संघाकडून पराभव झाल्यानं त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><><>

दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट संघ भारताच्या दौऱ्यावर आला आहे. या दौऱ्यात दोन कसोटी सामने होणार असून त्यातला पहिला उद्या कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर सुरु होईल. भारतीय संघाचं नेतृत्व शुभमन गिल कडे असून दक्षिण आफ्रिकेचा करणाधार तेंबा बावुमा आहे.

दक्षिण आफ्रिका अ आणि भारत अ संघादरम्यानचा एकदिवसीय सामना आज राजकोटमधे होईल.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी जी सात देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत, ऊर्जा सुरक्षा आणि दुर्मिळ महत्त्वाच्या खनिजांसंबंधीच्या संपर्क सत्रात सहभाग घेत भारताची भूमिका मांडली. या बैठकीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र मंत्री कॅनडाच्या दौऱ्यावर गेले आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार्य हाच एकमेव मार्ग असून, भारत आंतरराष्ट्रीय भागीदार देशांसमवेत रचनात्मक कार्य करण्यास तयार असल्याचं त्यांनी नमूद केलं.

डॉ. जयशंकर सागरी सुरक्षा आणि समृद्धी याविषयीच्या दुसऱ्या सत्रातही सहभागी झाले होते. महासागर दृष्टीकोन, हिंद-प्रशांत सहकार्य आणि देशांतर्गत बंदर नेतृत्व विकासाच्या माध्यमातून सागरी सुरक्षेविषयीचा भारताचा दृष्टीकोन अधोरेखित केला.

**<><><><><>**

पिकांचे अवशिष्ट जाळण्याबाबत पंजाब आणि हरयाणा सरकारने घेतलेल्या खबरदारीबाबतचा अहवाल सादर करायचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने पंजाब हरयाणा राज्य सरकारला दिले आहेत. पिकांची अवशिष्ट जाळणे तसंच दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरातल्या प्रदूषणाबाबत १९८५ मध्ये दाखल झालेल्या एका याचिकेची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. न्यायमूर्ती भूषण गवई आणि के विनोद चंद्रन यांच्या पीठाने सुनावणी दरम्यान हा अहवाल मागवला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढच्या आठवड्यात प्रदूषणाबाबतची सुनावणी सुरु होईल असं त्यांनी स्पष्ट केलं.

**//<><><><><>//**